आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.com





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २६४ वा ● बुधवार दि. ०६ मार्च २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## माजलगावात शेतकरी कामगार पक्षाचा विराट बैलगाडी मोर्चा

माजलगाव (प्रतिनिधी)गेल्या अनेक वर्षापासून शासनाने शेतकरी कर्जमाफीच्या नावाखाली झुलवत ठेवला असून २०२३ चा पिक विमा कृषीमंत्र्यांनी वारंवार घोषणाबाजी करून देखिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केलेला



नाही.गेल्या दहा वर्षांपूर्वी कापसाला असणारा भाव आजही तोच असुन तो वाढवला जात नाही,सोयाबीनचा भाव प्रत्येक वर्षी कमी होत आहे आणि वयोवृद्ध शेतकऱ्यांना शासन दुर्लक्षित करून त्यांना पेन्शन द्यायला तयार नाही,बिड जिल्हा दुष्काळाच्या झळा सहन करत असताना जिल्ह्यात दुष्काळी उपाय योजना अद्याप सुरू झालेल्या नसून गुरांच्या चारा पाण्याचा प्रश्र्न ऐरणीवर आलेला असताना आमदारासह मंत्री आपल्याच मोठेपणात व्यस्त आहेत.शासनाने १३८०००/-रुपयात **(पान २ वर) ...**

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापकांच्या वेतनाविषयी विधी न्याय विभागाचा अभिप्राय मागवा

मुंबई, : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा



विद्यापीठ तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या दोन विद्यापीठांकडील प्राध्यापकांच्या वेतनाविषयी विधी व न्याय विभागाकडून अभिप्राय मागवावा अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

या दोन्ही विद्यापीठातील प्राध्यापकांना कन्हेरे, कदम समितीनुसार वेतन देण्याच्या प्रश्नाबाबत मंत्रालयात मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय फुलारी, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर,उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, यांच्यासह दोन्ही विद्यापीठांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापकांना ५ व्या वेतन आयोगानुसार वेतन देत असल्याचा मुद्दा सांगून मंत्री श्री. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांना ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन दिले जाते. हा वेतनातील दुजाभाव योग्य नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार स्थानिक निवड मंडळाने निवड केलेल्या उमेदवारांविषयी विद्यापीठाने निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानुसार विद्यापीठांनी निर्णय घ्यावा. तसेच या प्राध्यापकांना वेतन देण्याविषयी विधी न्याय विभागाला सविस्तर व सकारात्मक माहिती सादर करुन अभिप्राय मागवावा अशा सूचना त्यांनी दिल्या.

## अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी २४ कोटीवर निधी वितरणास मान्यता

मुंबई, :- अवकाळी पावसामुळे डिसेंबर,२०२३



व जानेवारी, २०२४ या कालावधीत झालेल्या शेती पिकांच्या नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी २४ कोटी ६७ लाख ३७ हजार रुपये इतका निधी वितरीत करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून या निर्णयामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत व दिलासा मिळणार आहे. डिसेंबर, २०२३ व जानेवारी, २०२४ या कालावधीत झालेल्या शेती पिकांच्या नुकसान भरपाईपोटी मदतीसाठी प्राप्त प्रस्तावानुसार राज्य शासनाने ही मदत वितरित करण्यास मान्यता दिली आहे, असे मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी सांगितले. श्री. पाटील यांनी सांगितले, अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहते. अवेळी पाऊस, गारपीट व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता सुधारित दराने २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

## 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे

मुंबई, : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाची अंमलबजावणी' या विषयावर कृषी संजीवनी प्रकल्पाचे कृषी विद्यावेत्ता तसेच मृदा विज्ञान तज्ज्ञ विजय कोळेकर यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी राज्य शासन 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प' राबवित आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील सर्व दुष्काळग्रस्त भागांची पाहणी केली जात असून, या अंतर्गत शेतकऱ्यांना पाणी आणि हवेच्या परिस्थितीनुसार शेती करण्याबाबतचा सल्ला दिला जात आहे. तसेच लागवड केलेल्या जमिनीमध्ये मातीचा पोत, खनिजे आणि बॅक्टेरियाची कमतरता याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. हवामान बदल आणि अनियमित पावसामुळे शेती उत्पादनावर होणाऱ्या संकटातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्न करत आहे.

# मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी स्वीकारला पदाचा कार्यभार

मुंबई, : महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी या पदावर भारत निवडणूक आयोगाने भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकारी एस. चोकलिंगम यांची नियुक्ती केली. त्यानुसार आज दि. ५ मार्च २०२४ रोजी श्री.चोकलिंगम यांनी प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र, मंत्रालय, मुंबई या पदाचा कार्यभार विद्यमान मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्याकडून स्वीकारला. निवडणूक आयोगाच्या अधिसूचनेनुसार, नियुक्त महाराष्ट्र केडरचे आय.ए.एस अधिकारी एस. चोकलिंगम पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमीचे महासंचालक म्हणून कार्यरत होते.



# मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई यांच्यात सामजस्य करार

मुंबई, : उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र शासन व भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (IIT) यांच्या दरम्यान राज्यात ड्रोन मिशन राबविण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला.

यावेळी आमदार विक्रम काळे, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, संशोधन व विकास,आय.आय.टी चे अधिष्ठाता प्रा.सचिन पटवर्धन आदी उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्यावतीने उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री. रस्तोगी यांनी तर आयआयटी, मुंबईच्या वतीने प्रा. पटवर्धन यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रामध्ये ड्रोन तंत्रज्ञानाची उपयुक्तता व वाढता वापर करण्याकरिता राज्यात अत्याधुनिक ज्ञानावर आधारित ड्रोन मिशनची आखणी, प्रभावी अंमलबजावणी व सर्वसमावेशक यंत्रणा तयार करण्यासाठी मिशन ड्रोन राबवण्यात येणार आहे. या मिशनच्या प्रकल्पांतर्गत ५ वर्षासाठी २३ हजार ८६३.४३ लाख रुपयांच्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तर आयआयटी, मुंबई यांना १५ हजार १८१.७१ लक्ष निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.




ड्रोनच्या वापरामुळे शेतामध्ये पीक पहाणी व फवारणी कमी वेळात व कमी किंमतीत होऊ शकणार आहे. दुर्गम भागामध्ये औषधे, लसींचे तसेच सर्पदंश व श्र्वानदंश लसींचे वितरण करणे, दुर्घटनेच्या ठिकाणी तातडीने व्हीडिओ कॅमेरा व ध्वनिक्षेपन यंत्रणा उपलब्ध करणे, दुष्काळप्रवण क्षेत्राची पहाणी व सनिंत्रण करणे, पुरग्रस्त क्षेत्राचा अंदाज घेणे, जंगलातील वणवा नियंत्रण करणे, जमीन वापराचे व वन क्षेत्र निश्र्चित करणे, पूरग्रस्त भागात जीवनावश्यक वस्तूंची मदत पोहचवणे, सिंचनक्षेत्र निश्र्चित करणे, जलसाठ्यांचे संवर्धन, जमिनीची धूप, दरड कोसळणे याबाबत उपाययोजना, बांधकाम क्षेत्रामध्ये कामाच्या प्रगतीची काटेकोर मोजमाप करणे, कायदा आणि सुव्यवस्थेची अंमलबजावणी, वाहतुक व्यवस्थापन याक्षेत्रांमध्ये प्रभावी व सोप्यापद्धतीने काम करता येणार आहे.

# देशाच्या महासत्ता होण्याच्या वाटचालीत महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राचा मोलाचा वाटा असणार

मुंबई, : बालकांवर संस्कार करून देशाचे भविष्य घडविण्याचे काम शाळांमधून होत असते. स्पर्धात्मक युगात विद्यार्थी मागे राहणार नाही यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी स्वत: लक्ष देत असून २०४७ पर्यंत भारत महासत्ता होण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने महाराष्ट्र अग्रेसर राहावा यासाठी राज्य शासनामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान नुकतेच राज्यात राबविण्यात आले, या अभियानादरम्यान तीन उपक्रमांचे रेकॉर्ड झाले असून 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस' च्या वतीने प्रमाणपत्र देण्यात आल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्यासह संपूर्ण यंत्रणेचे अभिनंदन केले.

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियान राज्यात १ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. यादरम्यान घेण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्या शाळांचा पारितोषिक देऊन मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते आज गौरव करण्यात आला. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार सर्वश्री कपिल पाटील, विक्रम काळे, शेखर निकम, राजेश पाटील, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शालेय शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्यासह शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी, विजेत्या शाळांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, आई जशी बाळाला लळा लावते त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना देखील शाळेचा लळा लागत असतो. या शाळेतील वातावरण आनंददायी असावे तसेच शिक्षक, पालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांच्यामध्ये



शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी व त्यायोगे स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रेरणादायी वातावरण मिळावे यासाठी हे अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. याद्वारे ठरविलेले उद्दिष्ट साध्य झाले असून यात एक लाखांहून अधिक शाळांमधून सुमारे दोन कोटी विद्यार्थी सहभागी झाले. त्याचप्रमाणे अभियान कालावधीत राबविण्यात आलेल्या 'वाचन सवय प्रतिज्ञा', एका दिवसात शिक्षण विषयक हस्तलिखित अभिप्राय अपलोड करणे तसेच वाचनाचे महत्त्व सांगणारा युट्युब वरील व्हिडीओ विद्यार्थी आणि पालकांनी बघणे या तीनही उपक्रमांची दखल घेऊन 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद घेतली गेली ही राज्याच्या दृष्टीने अतिशय गौरवास्पद बाब असल्याचे ते म्हणाले. शिक्षणमंत्री श्री. केसरकर यांनी यासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांचे कौतुक केले.

शासनाने नुकताच अंतरिम अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये अनेक जनहितार्थ निर्णय घेण्यात आले आहेत. सर्वसामान्य, कष्टकरी, शेतकरी, तरुण, तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. नुकतीच सुधारित पेन्शन योजना लागू केली आहे, त्यामध्ये शिक्षकांचाही समावेश असल्याचे मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले. उद्योग, परकीय थेट गुंतवणूक आदींसह सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर आहे. आजची पिढी ही उद्याचे भविष्य असल्याने शाळांच्या **(पान २ वर) ...**

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे मुंबईत आगमन

मुंबई : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आज सायंकाळी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे आगमन झाले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,



उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी श्री. शाह यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी आमदार सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, प्रवीण दरेकर, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, राजशिष्टाचार विभाग तसेच पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मुंबई बंदर प्राधिकरणाच्या जमिनींवरील गाळेधारकांना दिलासा मिळावा यासाठी महाराष्ट्र भाडेनियंत्रण कायद्यात सुधारणा करणारा अध्यादेश तातडीने काढावा

मुंबई, : मुंबई बंदर प्राधिकरणाच्या जमिनींवरील निवासी



आणि व्यापारी भाडेधारकांना दिलासा मिळावा यादृष्टीने महाराष्ट्र भाडेनियंत्रण कायदा १९९९च्या कलम ३ मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असून त्यासाठी तातडीने अध्यादेश काढण्यात यावा, अशी विनंती विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. मुंबईत कुलाबापासून शिवडीपर्यंत मुंबई बंदर प्राधिकरणाच्या जमिनींवर सुमारे ४००० इमारती उभ्या असून त्यात हजारो कुटुंबांच्या निवासी आणि व्यापारी आस्थापना आहेत. अशा हजारो कुटुंबांना महाराष्ट्र भाडेनियंत्रण कायदा १९९९ च्या सवलतींचा लाभ मिळत नाही याउलट अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या कायद्यामध्ये दुरुस्ती सुचविणारा अध्यादेश काढला गेल्यास, संबंधितांना दिलासा मिळू शकेल. हा अध्यादेश निघेपर्यंत कोणाही भाडेधारकास बेघर करण्यात येऊ नये अशी मागणीही विधानसभा अध्यक्ष ड. नार्वेकर यांनी केली आहे.

महाराष्ट्र भाडेनियंत्रण कायदा १९९९ अन्वये घरभाडे, घरमालक आणि भाडेकरु यासंदर्भातील बाबींचे नियंत्रण करण्यात येते. या कायद्यान्वये घरमालक आणि भाडेकरु अशा दोघांचे हक्क सुरक्षित करण्यात आले आहे. मुंबई बंदर प्राधिकरणाच्या अखत्यारित मुंबईतील फार मोठ्या जमिनीचा हिस्सा येतो ज्यावर अनेक इमारती उभ्या असून त्यात वर्षानुवर्षे हजारो कुटुंबे वास्तव्य करीत आहेत. मुंबई बंदर प्राधिकरणाच्या जमिनींवरील निवासी आणि व्यापारी आस्थापनांना महाराष्ट्र भाडेनियंत्रण कायदा १९९९ मधील कलमे लागू होतात किंवा कसे, याबाबत संदिग्धता आहे. ही संदिग्धता दूर व्हावी आणि वर्षानुवर्षे या इमारतींमध्ये वास्तव्य करणाऱ्या भाडेकरुंना दिलासा मिळावा यासाठी महाराष्ट्र भाडेनियंत्रण कायदा १९९९ च्या कलम ३ मध्ये सुधारणा करणारा अध्यादेश काढला जाणे आवश्यक आहे, याबाबीकडे विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी लक्ष वेधले आहे.

भाडे नियंत्रण कायदा, १९९९ मध्ये सूट देण्याबाबतच्या तरतुदीमध्ये स्पष्टता येणे आवश्यक असून स्थानिक प्राधिकारी संज्ञेत मुंबई महापालिकेबरोबरच मुंबई बंदर प्राधिकरणाचाही समावेश या अध्यादेशाद्वारे केल्याने सुस्पष्टता येईल, असेही या निवेदनात विधानसभा अध्यक्ष ड. नार्वेकर यांनी नमूद केले आहे.

या अध्यादेशामुळे मुंबई बंदर प्राधिकरणाच्या जमिनींवरील इमारतींमध्ये वास्तव्य करीत असलेल्या सुमारे ४ लाख भाडेकरु कुटुंबांना या सुधारित कायद्याचे सुरक्षा कवच प्राप्त होईल आणि दिलासा मिळेल. त्यामुळे या विनंतीचा शासनाने विचार करुन तात्काळ अध्यादेश निर्गमित करावा, असेही निवेदनात म्हटले आहे.

विधान भवन, मुंबई येथे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष ड. नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई बंदर प्राधिकरणाच्या जमिनींवरील गाळेधारकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुंबई बंदर प्राधिकरणाचे (बीपीटी) चेअरमन राजीव जलोटा उपस्थित होते. या बैठकीत गाळेधारकांनी भाडेपट्टा नूतनीकरण, शुल्क आकारणी यासंदर्भात येणाऱ्या अनेक अडचणी मांडल्या होत्या. बीपीटीचे क्षेत्र कुलाबा, भायखळा, वडाळा, ट्रॉम्बे, चेंबूर, शिवडी असे काही हजार एकरवर पसरलेले असून समस्याग्रस्त गाळेधारक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

## १६ ते २२ मार्च कालावधीत 'जलजागृती सप्ताह'

मुंबई :- आंतराष्ट्रीय स्तरावर २२ मार्च हा दिवस 'जागतिक जल दिन' (Water for Peace) म्हणून साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने राज्यात १६ ते २२ मार्च, २०२४ या कालावधीत जलजागृती सप्ताह साजरा करण्यात येणार असल्याचे जलसंपदा विभागाचे उपसचिव (लाक्षेवि) म. रा. वानखेडे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## झरोका

एक – लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता कधीही लागू शकते पण निवडणूक आयोगाने जात,पात,धर्माच्या नावावर कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्यानी, उमेदवारानी प्रचार,प्रसार करु नये अशी तंबी दिल्याने राष्ट्रीय स्वंयसेवक संघ, भाजपाचा पराभव अटळ आहे हेच वास्तव दिसते पण तशी धर्मनिरपेक्ष, जातविरहीत निवडणूक पार पडेल काय याचीच काळजी वाटतेय कांहीच कळत नाही. डोकं बधीर झालय.

दुसरा – अरे, निवडणूक आयोगाचे काय घेवून बसला आहेस. जात, पात, धर्म ही आरएसएस, भाजपाची खेळी असली तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सल्ल्यानुसार जात, धर्मावर बंदी घातली असावी कारण उद्याच्या लोकसभा निवडणूकीत राम, राममंदीर, रामप्राणप्रतिष्ठापणा हाच एक मूद्दा असून अयोध्येनंतर अनेक देवी, देवताच्या मंदीराचे शुभमंगल मोदीजीनी केले असल्याने राम ही एक व्यक्ती, प्रवृत्ती, प्रकृती आणी मर्यादा पुरुषोत्तम अशी व्याख्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी केली असल्याने जात, धर्मावर निवडणूका नाहीतच केवळ राम नामावर असतील पण तू एवढा भारावून कसा काय गेलास हेच कळत नाही.

एक – अहो, आजवरच्या निवडणूका जात, धर्म, पैसा, साम दंड, भेदावरच होत आलेल्या आहेत त्यामूळे असे कसे काय होईल म्हणूनच शंका वाटतेय.

दुसरा – अरे, राम, राममंदीराच्या नावावर सोने, चांदी जमा झाले. अब्जावधी रुपये जमा झाले मग निवडणूकी निधीची काय गरज पडते. रामाच्या नावावर पैसा आणी तो प्रसादाच्या नावाखाली मतदाराना वाटप केलयास अडचणच नाही पून्हा नरेंद्रजी मोदीजीच समजले.

एक – अहो, पण असे गणीत नरेंद्र मोदीजीचे असेल तर कोणी रामभक्त हनुमान, लक्ष्मन किंवा रामपूत्र लव, अंकूश वगैरे निवडणूकीत उतरले तर काय होईल याचीही काळजी वाटतेय म्हणून बोलतो आहे.

दुसरा – अरे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ही व्यक्ती नसून एक आत्मा, परत्मा आहे ते परब्रम्हगुरु आहेत. त्याना विश्वगुरुच काय तराळ, अंतराळाची भाषा कळतेय म्हणूनच त्यानी रामप्राणप्रतिष्ठापणा केलीय हे साधे गणीत कळत नसेल तर ईडीला सांगू काय गप्प बस्स.

## काय बोलता राव ?

लातूर राखीव लोकसभा मतदार संघातील निवडणूकीचे पडघम् वाजतच नाहीत. सारा भारत आणी महाराष्ट्रात खाच, खळग्याची कुजबूज होत असताना लातूर कसे काय सामसूम आहे हेच कळत नाही. माजी मंत्री अमित देशमूख यांच्या रुपाने दिवंगत कॉग्रेस नेते विलासराव देशमूख हेच कारभार पाहात आहेत काय यातील गूढ काय ते कळतच नाही. परवाला बार्टीच्या विरोधात आर्टी स्थापन केली ती मागणी आ. अमित देशमूख यानी केली होती म्हणून माजी मंत्री, सहकारमहर्षी दिलीपराव देशमूख यांचा सत्कार अण्णाभाऊ साठे प्रेमीनी केले असे वृत्तपत्रातून वाचण्यात आले मग लातूर लोकसभा मतदार संघातून कॉग्रेसचा उमेदवार दिलीपराव देशमूख की अमित देशमूख ठरविणार आहेत याचीच कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे.

**काय बोलता राव,**

अरे, विलासराव देशमूख यानी राजकारण, सत्ताकारण, विकासकारण केले परंतू राजनिती ही दिलीपराव देशमूख यांचीच होती असे जूने, जानते लोक म्हणतात पण अमित देशमूख यानी पूढचे पाऊल उचलले. कॉग्रेसकडे उमदा उमेदवार नाहीच. पण शासकीय प्रशासकीय यंत्रणेतील भाई नगराळे हे आज उताविळ असले तरी अमित देशमूखाना राजकीय वारसा नसल्याने दिलीपराव देशमूख ज्याना सहमत दाखवितील तोच उमेदवार ठरेल पण भाजपा तर्फे खा. सुधाकर शृंगारे आणी इंजिनिअर विश्वजीत गायकवाड यांच्यात चित्तपटीचा खेळ सुरु असून माजी मंत्री निलंगेकर, रमेश कराड, आ. अभिमन्यू पवार माजी आ. खंदोडे वगैरे मंडळी गायकवाड यांच्या भोवतीच असल्याने माजी आ. राम गुंडीलेची पंचायत झाली असून अर्थमंगळ्याची आरती कोण कोणाकडे मिरवितो यावरच भाजपाचे उमेदवाराचे भवितव्य अवलंबून असले तरी आजघडीला कॉंग्रेसला लातूर लोकसभा मतदार संघात स्थान मिळणार नाही असेच दिसते मग बोला दाजीबा !

# एका कवितेत किती कविता असतील?

## संपादकीय...

हिंदुत्व सांभाळणारे राष्ट्र, महिला दिन साजरा करून महिला सक्षमीकरण करणारे सरकार, सर्वधर्म समभावाचे प्रतीक म्हणून जगाच्या विचार- पिठावर नाचणारे केंद्र सरकार त्या साऱ्या भारताला-प्रशासनाला आर्थिक बळ देणारे महाराष्ट्र शासन मग ते कोणत्याही राजकीय पक्षाचे असो की दगाबाज पक्ष फोडीतून पारदर्शक-न्यायिक कारभारी बनलेले शासन असो त्याबद्दल अवाच्य अक्षर ही बोलता येत नाही कारण लोकशाही भारताची मोदी सरपंच होऊन बसली आहे की काय अशीच ओरड सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होताना दिसते आहे ती बाब अनावश्यक कशी समजावी हे एक कोडेच वाटते आहे.

भारत स्वातंत्र्य कधी झाला हे आम जनतेला माहित आहे पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खरा स्वातंत्र्य भारत२०१४ ला म्हणजे नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान बनल्यावरच झाला असे भाकीत केले पण त्यावर कोणी ठरवला किंवा याचिका दाखल केली नाही हेच मोदीजीच्या यशाची पावती ठरावी असेच नाविला जाणे कबूल करावे लागेल. पंजा महाराष्ट्रवरच्या आर्थिक बळावर नेहरू, शास्त्री, गांधी, गांधी, बाजपेयी ,सिंह , सिंग,गुजराल, देवीघोडा वगैरेंनी सत्ता भोगली ती पारतंत्र्यातील भारताचे पंतप्रधान होते आणि हेच स्वातंत्र्य भारताचे नरेंद्र मोदी पंत की प्रधान म्हणून उदयास आले हे राम जाने परत भारताचे प्रधानमंत्री म्हणून नरेंद्र मोदी यांची किमया लय भारी वाटते असाच बोलबाला होताना दिसतो आहे.

मागील पुराण कथा वाचून काहीच फायदा नाही. मणिपूर मध्ये काय घडले याची वाच्यता करता येवच नाही. महिलांवरील अन्याय अत्याचार करणारे सत्ताधारी विरोधी पक्षाचे लोकप्रतिनिधी किंवा निकटचेच असतात त्यात सरकारही त्याचेच आणि विरोधी पक्षते ते ही त्यातलेच म्हणून सर्व काही अलबेल आणि सर्वसामान्यासह महिला सबलीकरणासाठी ही ते महत्त्वाचे ठरते म्हणून कोणीही काहीच बोलू शकत नाही परंतु प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अधिपत्याखालील महाराष्ट्राच्या शिंदे, फडणवीस, पवार सरकार मधील न्यान्यिक-पारदर्शक कारभार-संदर्भात जी महिला संदर्भातील आक्रोशी आर्तहाक दुमदुमूते आहे काहीच बोलले जात आहे.,

महाराष्ट्र शासन प्रशासन मुलगा न करण्या पलीकडची गोष्ट म्हणजे राजकीय खेचाखेची भाजपने शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस फोडली आणि शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले. उपमुख्यमंत्री म्हणून माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली आणि फडणवीस यांचे जुने मित्र राष्ट्रवादीचे अजित पवार यांनी तर गृहजल करून फडणवीसच्या फडात सहभाग घेऊन उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री पद हस्तगत केले पण आजच्या महाराष्ट्रात महिलांचे काय स्थान आहे. महिल सबलीकरण-पारदर्शक कारभार-न्याय प्रशासन कोठे गेले असाच संत नागरिकांत होताना दिसतो आहे त्याचे काय ?

शासन -प्रशासनाबद्दल बोलण्यासारखे काहीच नाही सत्ता कारण आणि प्रशासन हे आपापली खुर्ची सांभाळण्यातच व्यस्त मस्त दंग असल्याने आरोग्य विभागाकडे कोण लक्ष देणार आहे कशाला कारण वरस सारा गोंधळ तर खाली कशाला सवाल म्हणून जिकडे तिकडे आनंदी गडे म्हणून सर्वच अधिकारी सुखी असतील पण कोणी नंदुरबार सारख्या आदिवासी नर्सरी विभागातून कविता राऊत बाळंतपणासाठी बर्डी पाढ्यातून अकलूजला या तालुक्याच्या ठिकाणी येते, तेथे तिची आहे ना होते, डॉक्टर विना कंम्पाउडरणे इंजिक्शन दिले ते दुसरेच-ती अस्वस्थ होते, तिला तालुक्याच्या ठिकाणावरून जिल्ह्याच्या ठिकाणी नेले जाते तिथे उपचार होत नाहीत उच्चस्थ दवाखान्यात नेत असताना ती जीव सोडते. सर्वसामान्य जनतेसह शासन-प्रशासन, आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचा निरोप घेते त्यावेळी नरेंद्र मोदी किंवा एकनाथ शिंदे यांच्या पारदर्शक- न्यायिक कारभाराची चिरफाड-कारभाराची शेवकार्मी विच्छेदना, कार्यप्रणालीची चिकित्सा ईडी,सीबीआय की उद्याच्या सक्षम भारताच्या सक्षम महिला करणार आहेत याचा उलगडा बोलघेवडे सत्ताधुंद शासक मोदीजी-शिंदेजी, फडणवीसजी-पवारजीच करतील की आम जनतेच्या मतदाराच्या भरवश्यावर उद्याच्या सत्ताकारणचे भविष्य ठरवितील हेच समजणे कठीण वाटते पण एका कविता राऊत मुळे सारे उघडे पडले परंतु अशा किती कविता हाक ना बोंब म्हणून मुत्युस कवटाळल्य असतील याचे विवरण आजच्या विद्यमान सरकार-प्रशासनाने निवडणुकीपूर्वीच करावे असा बोलबाला होताना दिसतो आहे तो अनाठाई नसावा हेच वास्तव ठरावे.

# महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षित

८ मार्च आंतरराष्ट्रीय महीला दीवस हा महीलांसाठी प्रेरणादायी ठरला पाहिजे.कारण जगातील महिलांनी पुर्वीच्याकाळी काय संघर्ष केला आणि आता कसा संघर्ष करावा लागत आहे याची आठवण ८ मार्चच्या निमित्ताने दिसून येते.महीला दिनाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व आम नागरिकांनी स्विकारली पाहिजे. कारण महीला ही प्रत्येकांची आई,मुलगी,बहिण,पत्नी,वैनी, आत्या, मामी, माउशी, आजी, सुन,सासु,काकु इत्यादी मानसन्मानाची उपमा आहे त्याचे पालन सर्वांनीच करायला हवे.यामुळे महीलांमध्ये व समाजामध्ये मोठी उर्जा निर्माण होवून एक नवीन चालना मिळुन शकते.देशात किंवा जगात महीलांची एक महत्वपुर्ण भुमिका असते.आज देश स्वतंत्र्या पासुन तर देशाच्या विकासापर्यंत महीलांचा मोठा हातभार लागला आहे.देश विकासाच्या दृष्टीकोणातुन आज महीला अग्रेसर आहेत.परंतु २१ व्या शतकात महीला स्वतःला असुरक्षित समजतात ही चिंताजनक बाब आहे.आज महीला सुरक्षा विभाग,खेळ विभाग, उद्योग क्षेत्र आणि अनेक सरकारी व खासगी क्षेत्रात महिला मोठ्या दीसुन येतात.अनेक निवडणुकांमध्ये महीलांसाठी आरक्षणसुध्दा आहे.परंतु पुरूष प्रधान देशात राजकीय पुढाऱ्यांनी महीलांना अजुनपर्यंत पुर्ण स्वतंत्र दील्याचे दीसत नाही. लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये अजुन पर्यंत महीलांना सरकारने आरक्षण जाहीर केले नाही.ही महीलांच्या प्रती शोकांतिकाच म्हणावी लागेल.खालच्या स्तरावरील निवडणुकांमध्ये महीलांना आरक्षण आहे ही स्वागतार्ह बाब आहे. परंतु उच्चस्तरीय राजकारणात सरकारने महीलांना कोसो दुर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.भारतात रनरागीनी झाशीची राणी लक्ष्मीबाई पासुन तर आतापर्यंत महीलांनी देशाला स्वातंत्र्याकरीता, सुजलाम्-सुफलाम करण्याकरीता आणि देशाला विकासाच्या नविन शिखरावर नेण्याचे काम भारतीय महीलांनी नेहमीच केले आहे ही आनंदाची,गौरवाची व अभिमानास्पद बाब आहे.त्याच प्रमाणे देशहीताच्या कामासोबत भारतीय संस्कृतीचे जतन कसे केले पाहिजे याची शिकवणसुध्दा महीलांपासुनचसर्वांना मिळत असते.कथेच्या माध्यमातून किंवा गोष्टींच्या आधारे वृध्द महिला बालगोपालांना संस्कृतीचापाठ शिकवित असतात.म्हणुनच देश घडविण्याकरीता पुरूषांचा जीतका वाटा आहे तीतकाच वाटा महीलांचा आहे.त्यामुळे ८ मार्च हा दीवस महीलांसाठी नविन दीशा ठरणारा सिध्द व्हायला पाहिजे.सेवाभावी संस्था, डॉक्टर,नर्स,पायलट, वकील,जज, पोलिस विभागा आणि आता महीलांना आर्मीमध्येसुध्दा मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्यात येत आहे. म्हणजेच आजची महीला पुरूषांच्या बरोबरीने चालुन देशाला नवीन दीशा देण्याचे काम करीत असल्याचे मी समजतो.पुर्वी महीलांना अनेक क्षेत्रात स्वतंत्र नव्हते. परंतु आधुनिक युगात महीला सक्षम आहे.त्यामुळे संपूर्ण क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे दिसून येते.महीला राष्ट्रपती,महीला मुख्यमंत्री,महीला प्रधानमंत्री, वैज्ञानिक, लोकसभा अध्यक्ष, पोलिस कमिशनर,अंतराळवीर,इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण पदांवर महीला विराजमान होत्या, आहे आणि पुढेही राहु शकतात याला नाकारता येत नाही.महीलांच्या या महत्त्वपूर्ण पदांमुळे भारतात महीलांनी इतिहास सुध्दा घडविला आहे. माओवादग्रस्त भागासाठी आदीवासी भागातील माडिया जमातीतील डॉ.कोमल मडावी ही एक प्रेरणादायी महीला ठरली तीची स्तुती कराल तीतकी कमी पडेल.आज भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात महिलांनी आपले नाव लौकीक केले आहे. राजकारण, समाजकारण, सुरक्षा, चित्रपट सृष्टी, खेळजगत,आर्मि, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैमानिक इत्यादीसह अनेक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा महीलांनी भरारी मारली आहे आणि प्रत्येक देशातील महीलांनी आपल्या देशाचे नाव लौकीक करून सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे.भारतीय महीलांनी सर्वच स्तरात उंच भरारी मारली आहे त्याचसोबत भारतीय संस्कृती टीकवुन ठेवण्याची महत्वपूर्ण भुमिका भारतीय महिलांचीच आहे.महीलांचा वाढता विकास ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून व जगाच्या दृष्टीकोनातून स्वागतार्हबाब आहे. परंतु भारतात महीलांवर वाढते अत्याचार रोखण्यासाठी देशातील राज्य सरकारे असमर्थ असल्याचे दिसून येते.या करीता महीलांवरील वाढता अत्याचार पहाता सरकारने फास्ट ट्रॅककोर्ट अंमलात आणुन महीलांवर होत असलेले अत्याचार यावर अंकुश लावला पाहिजे.कारण आजच्या(सोशल मिडियाच्या) मोबाईलच्या युगामुळे महीलांवरील अत्याचार वाढत आहे.कारण महीलांवरील अत्याचार पहातो किंवा ऐकतो तेव्हा अंगावर शहारे येतात अशा अनेक घटना भारतात घडलेल्या आहे.मुलींचे अपहरण किंवा त्यांची हत्या यावर पुर्णतः अंकुश लावण्याची गरज आहे.आंतरराष्ट्रीय महीला दीवसाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेला सर्वात जास्त प्राधान्य सरकारने द्यायला पाहिजे. महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षीत तेव्हाच खऱ्याअर्थाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाला महत्त्व येईल.मानवाने मानुसकीचे पालन केले तर महीलांवरील अत्याचारावर आपोआपच अंकुश लागु शकतो.ज्या प्रमाणे महीला मुलांचे संगोपन करते त्याचप्रमाणे महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी मानवाने स्वीकारली पाहिजे.तेव्हाच महीला सुरक्षित राहू शकतात.कारण महीलांवरील अत्याचार हा गंभीर आणि चिंतेचा विषय आहे. त्यामुळे देशाच्या व जगाच्या दृष्टीकोनातून ही धोक्याची घंटा आहे.आज भारताचा विचार केला तर महीला अत्याचाराच्या लाखो केसेस कोर्टामध्ये प्रलंबित आहेत आणि महीलांवरील अत्याचाराच्या अनेक केसमध्ये तारीख पे तारीखअसा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारांना वेळेवर सजा व पिडीतेला वेळेवर न्याय मिळत नाही ही शोकांतिका आहे.यावरून स्पष्ट होते की आजच्या परिस्थितीत महीला सुरक्षित नाही.८ मार्च महीला दीवसाचे औचित्य साधून भारतासह संपूर्ण जगाने महीला सुरक्षेचा संकल्पकेला पाहिजे आणि महीलांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीची वागणूक दिली पाहिजे.महीलांचा सन्मान म्हणजे नारी जातीचा सन्मान,नारी जातीचा सन्मान म्हणजे देशाचा सन्मान,देशाचा सन्मान म्हणजे आंतरराष्ट्रीय महीला दीनाचा सन्मान.यातच खऱ्याअर्थाने महीला सशक्तीकरण दीसुन येईल.म्हणुनच म्हणतात बेटी बचाव बेटी पढाव. महीला देवी-देवतांच्या सान्नीध्यात राहुन आपला परीवार मंगलमय कसा राहील या दीशेने त्यांचे कार्य सुरू असते व संपूर्ण परीवाराची एक महीला आशेचे किरण घेऊन सर्वांना सावरण्याचा प्रयत्न करीत असते. त्यामुळे महीला उन्हात सावली,हीवाळ्यात उब देण्याचे काम परिवाराला करीत असते.त्यामुळे प्रत्येक महीलेला देवीच्याच रूपात पहायला पाहिजे.आज रशिया -युक्रेन युध्दा दरम्यान आपला देश वाचवीण्यासाठी आरपारची लढाई लढत आहे.यासाठी मुख्यत्वेकरून त्यांच्या पत्नींनी व मुलींनी सैनिकांचे मनोबल वाढवीले आहे.म्हणजेच मानसाचे मनोबल व धैर्य वाढवण्यासाठी महीलांची अतुट शक्ती असल्याचे दिसून येते.असे माझे स्पष्ट मत आहे.आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना मी आग्रह व विनंती करतो की जगात व देशात वाढते प्रदूषण व जंगलतोड पहाता आजच्या दिवसाला प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल.यामुळे सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.जय हिंद!

**लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**(माजि विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९ नागपूर.**

## देशाच्या महासत्ता होण्याच्या वाटचालीत...

**(पान १ वरुन) :** विकासासाठी विविध निर्णय घेण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले. शाळांना नवीन मान्यता देण्याची प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली. शाळांमधील पायाभूत सुविधा उत्तम असाव्यात यासाठी शाळा दत्तक देण्याचा निर्णय घेण्यात आला, यास अनेक उद्योजकांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते यावेळी राज्यस्तरावर शासकीय गटात प्रथम आलेल्या वाशिम जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा, साखरा (५१ लाख रुपये), द्वितीय क्रमांक मिळविलेल्या रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हेदवली (३१ लाख रुपये) आणि तृतीय क्रमांक मिळविलेल्या सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा ढालेवाडी (२१ लाख रुपये) या शाळांचा रोख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. तर इतर आस्थापनांच्या शाळांमध्ये प्रथम क्रमांक मिळविलेल्या नाशिक जिल्ह्यातील एस्पेलियर हेरिटेज स्कूल, बेळगाव ढगा (५१ लाख रुपये), द्वितीय क्रमांक मिळविलेल्या पुणे जिल्ह्यातील शारदाबाई पवार विद्यानिकेतन शारदानगर (३१ लाख रुपये) आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भोंडवे पाटील शाळा बजाजनगर (२१ लाख रुपये) या शाळांचा रोख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर सहा, 'अ' आणि 'ब' वर्ग महानगरपालिका स्तरावर सहा, विभागस्तरावरील ४८ शाळांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या अभियान कालावधीत १३ लाख ८४ हजार ४२६ विद्यार्थ्यांनी 'वाचन सवय प्रतिज्ञा' घेतली. २४ तासांच्या कालावधीत ११ लाख २० हजार ३८६ विद्यार्थ्यांनी शिक्षण विषयक हस्तलिखित अभिप्राय आणि फोटो बेसपोक प्लॅटफॉर्मवर अपलोड केले. तसेच वाचनाचे महत्त्व सांगणारा मंत्री श्री. केसरकर यांचा युट्युब वरील व्हिडीओ एकाच वेळी एक लाख ८९ हजार ८४६ विद्यार्थी आणि पालकांनी लाईव्ह बघितला. या तीनही उपक्रमांची दखल घेऊन 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद घेतली गेल्याची माहिती गिनीज बुक चे प्रवीण पटेल यांनी जाहीर करून संबंधित प्रमाणपत्रे मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्याकडे सुपूर्द केली.

## माजलगावात शेतकरी....

**(पान १ वरुन)** गरिबांना घरकुल देण्याची बोगस योजना आणली असून गरीब घरकुल धारकांना सात हजार रुपये ब्राश ने चोरटी वाळू खरेदी करावे लागत आहे तर लोकनेते साखर कारखान्याने गतवर्षी जाहीर केलेला भाव अद्याप शेतकऱ्याला दिलेला नसून १४९रुपये प्रति टन शेतकऱ्यांची थकीत बिले त्वरित वाटप करणे आवश्यक आहे.तसेच चालू हंगामात हरभरा पिकावर धुक्यामुळे पडलेल्या रोगराईने हरभरा पिक पूर्णतः उध्वस्त झाले असून शेतकऱ्यांना हरभरा पिकाच्या नुकसानी पोटी हेक्टरी २५ हजार रुपये नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे.तालुक्यातील सर्वात शासकीय कार्यालयात प्रचंड भ्रष्टाचार माजलेला असून भ्रष्टाचारामुळे अनेक कामे खोळंबून पडलेले आहेत.याशिवाय महागाईचा आगडोंब दिवसेंदिवस वाढत असून कष्टकऱ्यांना, कामगारांना,शेतकऱ्यांना जीवन जगणे कठीण झाले आहे,अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पशुधनासह सोलार व इतर चोऱ्या प्रचंड प्रमाणात वाढलेले असून त्याबाबत पोलीस यंत्रणा कुठलाही सखोल तपास करत म्हणून शेतकरी कामगार कष्टकरी यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे गरजेचे असल्याने शेतकरी कामगार पक्षाने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव येथे दि.१ मार्च २०२४रोजी सकाळी ०२ वाजता विराट बैलगाडी मोर्चा काढण्यात आला.या मोर्चाचे नेतृत्व भाई मोहन गुंड,भाई ड.नारायण गोले पाटील यांनी केले.या मोर्चात दिल्लीतील शेतकरी आंदोलनाच्या मागण्या मान्य करा, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करा.सन२०२३चा पिक विमा त्वरित वाटप करा,शेतकऱ्यांच्या शेतमालाला किफायतशीर हमीभाव द्या, शेतकऱ्यांच्या गुरांना दावणीला चारा-पाणी द्या, लोकनेते कारखान्याकडील गतवर्षीच्या प्रति टन १४९ रुपयाच्या थकित रकमेचे बिल त्वरीत वाटप करा,वयोवृद्ध शेतकऱ्यांना प्रतिमहा १०,०००/ रुपये पेन्शन द्या.धुक्यामुळे हरभरा पिकाच्या झालेल्या नुकसानीची हेक्टरी २५०००/नुकसान भरपाई द्या.तालुक्यात पशुधन,सोलारसह शेतकऱ्यांच्या झालेल्या विविध चोर्यांचा सखोल तपास करून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करा. शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार थांबवून खोळंबून पडलेली कामे त्वरित करा.गाव-वस्ती तेथे पाणी टँकर सुरू करा.गरिबांना घरकुलासाठी मोफत वाळू द्या.आदी मागण्यांची प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली.यावेळी शहरात वाहतूक विस्कळीत झाली,उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलकांनी बैलगाड्यासह ठिय्या मांडत प्रचंड घोषणाबाजी करत केंद्र व राज्य शासनाचा निषेध केला तर शेतकऱ्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष केल्यास सरकारवर आसूड उगारला जाईल,असा इशारा भाई ड.नारायण गोले पाटील यांनी दिला. यावेळी भाई मुंजा पांचाळ,भाई विष्णू शेळके, भाई राहुल सोळंके,गणेश भालेकर,बबनराव चोरमले,श्रीराम कोरडे,भाई राजाभाऊ घोडके, संभाजी चव्हाण,अशोक कुलकर्णी,सतिष शेजुळ,राधाकृष्ण पांचाळ,भगवान खांबे, चंदुकाका बालवत,राजेश्र्वर मोरे,कोरडे,अमोल गोले,साळुजी हांडे,चांगदेव शेजुळ,सुदाम चव्हाण,मधुकर माने,लक्ष्मण बादाडे,व्यंकटी खुळे,माऊली चंदनशिव,श्रीराम शेवाळे,जनार्दन कुदळे,प्रकाश थोरात,रामेश्र्वर मोरे,सुशील हांडे, गणेश सोनटक्के आदींनी परिश्रम घेतले.

# आ. अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यातून किल्लारीच्या ८ व्या व ९ व्या फेरीतील घरे व दुकाने वाटपास मंजुरी,

**२२ वर्षांपासूनचा प्रश्न निकाली..**
**४५३ कुटुंबांना मिळणार घरांची मालकी...**

**औसा -औसा तालुक्यातील किल्लारी येथील ८ व्या व ९ व्या फेरीतील लाभार्थी कुटुंबांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार हे कसोशीने प्रयत्न करत होते. अनेकवेळा हा विषय सभागृहात मांडला, तालुकास्तरापासून राज्यस्तरापर्यंतच्या प्रशासकीय बैठकांमध्ये वेळोवेळी पाठपुरावा केला. या सर्व प्रयत्नांना यश आले असून किल्लारी गावातील ८ व्या फेरीतील ३४६ व ९ व्या फेरीतील १०७ लाभार्थी कुटुंबांना घरांचे वाटप करण्यास व कबाला प्रमाणपत्र देण्यास तसेच ३८ दुकानांचे कबाला प्रमाणपत्र वाटप करण्यास मंजुरी प्राप्त झाली आहे. किल्लारी गावातील ४५३ कुटुंबांना आता भूकंपग्रस्त प्रमाणपत्रासह भूकंपग्रस्त आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे.**

आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून किल्लारीकरांच्या जिव्हाळ्याचा



आणखीन एक विषय मार्गी लागला. १९९३ च्या किल्लारी भूकंपानंतर झालेल्या पुनर्वसनात ७ व्या फेरीपर्यंतच्या घरांचे एकमताने वाटप करण्यात आले. २ सदस्यांच्या असहमतीमुळे ८ व्या व ९ व्या फेरीतील घरांचे वाटप एकमताने होऊ शकले नाही. निर्णय बहुमताने झाला असल्याने ८ व्या व ९ व्या फेरीतील पात्र लाभार्थी कुटुंबांनी घरांचा ताबा घेऊन राहायला सुरुवात केली. पण ८ व्या व ९ व्या फेरीतील घरवाटपाला शासनाची मान्यता नसल्याने पात्र कुटुंबांना मागच्या २२ वर्षांपासून मालकी प्रमाणपत्र (कबाले) व भूकंपग्रस्त प्रमाणपत्र नाकारण्यात येत होते. हा प्रश्न निकाली काढून ८ व्या व ९ व्या फेरीतील लाभार्थी कुटुंबांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार कसोशीने प्रयत्न करत होते.अनेकवेळा हा विषय सभागृहात मांडला, तालुकास्तरापासून राज्यस्तरा पर्यंतच्या प्रशासकीय बैठकांमध्ये वेळोवेळी पाठपुरावा केला. या सर्व प्रयत्नांना यश आले असून किल्लारी गावातील ८ व्या फेरीतील ३४६ व ९ व्या फेरीतील १०७ लाभार्थी कुटुंबांना घरांचे वाटप करण्यास व कबाला प्रमाणपत्र देण्यास तसेच ३८ दुकानांचे कबाला प्रमाणपत्र वाटप करण्यास मंजुरी प्राप्त झाली आहे. किल्लारी गावातील ४५३ कुटुंबांना आता भूकंपग्रस्त प्रमाणपत्रासह भूकंपग्रस्त आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे. कुटुंबाची नोंद ग्रामपंचायत मालमत्ता नोंदवहीत घेण्यास येणारी अडचण तसेच वीज जोडणी घेताना येणारी अडचणही दूर होणार आहे.याचबरोबर किल्लारी येथील मारुती मंदिर संस्थान, जामा मस्जिद, जैन मंदिर, निळकंठेश्र्वर देवस्थान संस्थान तसेच बालाजी मंदिर आदींच्या दुकान वाटपाचे प्रश्न मिटणार आहेत.

किल्लारीतील ४५३ कुटुंबांवरील २२ वर्षांपासूनचा अन्याय दूर करण्याच्या प्रयत्नांना भक्कम पाठबळ दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व पालकमंत्री गिरीश महाजन यांचे आभार मानले आहेत तसेच किल्लारी चा जिव्हाळ्याचा आणखीन १ विषय मार्गी लावता आला याबद्दल समाधान व्यक्त केले आहे...

**कुडाल संगम ..**
कृष्णा मलप्रभा नदी
स्थळ कुडाल संगम
बसवण्णाचे वास्तव्य
दृश्य दिसते विहंगम्
श्रमा माना परमेश्र्वर
रहावे नित्य कार्यक्षम
काय काकवे कैलास
पंचाचार आधार धर्म
समजून उमजून घ्या
षट्स्थल महिमा मर्म
ज्ञान भक्ती ब्रह्मांडाचे
इष्टलिंग जाणा उगम
अनुभवमंटपात चर्चा
विचार बनतील सुगम
वृथा कष्टवून शरीरास
यात्रा नको त्या दुर्गम
जन्माने नाही कर्माने
बनता येते हो जंगम
बसव वचन जाणता
गळती भ्रामक संभ्रम
लिंग दिक्षा लिंगायत
सरतो जातीवाद भ्रम
जातीभेद ना धर्मकांड
कर्माने बनतो आदम
२)
**सूरदास ..**
संत कवी सूरदास
गान विद्या पारंगत
काव्य शिरोमणी रे
अक्षर नसे अवगत
हिंदी साहित्य सूर्य
तेजेवलयी तळपत
वल्लभाचार्य शिष्य
जग असेओळखत
ज्योतिषशकूनविद्या
असे समग्र जाणत
बालकृष्ण लीलावर
पदे आपली विणत
जन्मान्ध होते तरी
कृष्ण वर्णन सांगत
हृदयी डोळसभक्ती
भजना आणी रंगत
अंतर्दृष्टीनी जाणती
कन्हैया गोड सिरत
उभी राही साक्षात
दोह्या लोभस मुरत
अकबर बादशहाने
सभेत केले स्वागत
नाकारले वैभवाला
सूरदास कृष्णभगत
**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नियोजन विभागाकडून सातारा एकात्मिक पर्यटन विकासाचा ३८१ कोटींचा शासन निर्णय जारी

## जिल्ह्यातील धार्मिक, ऐतिहासिक, निसर्ग, जल पर्यटनास वेग येणार

**मुंबई, :- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने, सातारा जिल्ह्याच्या पश्र्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाचा ३८१ कोटी ५६ लाख रुपयांच्या आराखड्यास मान्यता दिली असून त्यासंबंधीचा शासन निर्णय आज (५ मार्च) जारी करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या सातत्याने बैठका घेऊन या सुधारीत पर्यटन आराखड्यास मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची मान्यता मिळवली. त्यानंतर आजचा शासन निर्णय जारी झाला. या निर्णयामुळे सातारा जिल्ह्याच्या पश्र्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक, निसर्ग, जल पर्यटनस्थळांचा विकास होणार असून जिल्ह्याच्या आणि राज्याच्या पर्यटनवाढीस वेग येणार आहे.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील नियोजन विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, सातारा जिल्ह्याच्या पश्र्चिम घाट परिसरातील धार्मिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनस्थळे विकासाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याअंतर्गत श्रीक्षेत्र महाबळेश्र्वर, प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सहयाद्री



व्याघ्र राखीव वनक्षेत्रातील पर्यटन विकास तसेच कोयना हेळवाक वन झोन अंतर्गत कोयना नदी जलपर्यटनाची सुमारे ३८१ कोटी ५६ लाख रुपयांची विकासकामे करण्यात येणार आहेत. आराखड्यानुसार विकासकामांच्या अंमलबजावणीचे अधिकार आणि जबाबदारी साताऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. ही कामे ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांना देण्यात आले आहेत.

सातारा जिल्ह्यातील निसर्गाचे संवर्धन व्हावे, ऐतिहासिक, धार्मिक, जल पर्यटनस्थळांचा, निसर्गपुरक विकास व्हावा, जिल्ह्यात पर्यटकांची संख्या वाढावी या हेतूने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातत्याने मुंबईत आणि पुण्यात संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना मार्गदर्शन केले होते तसेच सुधारीत पर्यटन विकास आराखडा तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ८ फेब्रुवारी मुंबईत आणि तदनंतर पुण्यात यासंदर्भात बैठक घेतली होती.

त्यानंतर वेगाने कार्यवाही होऊन २२ फेब्रुवारी २०२४ रोजी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत सुधारित पर्यटन आराखड्यास मान्यता घेण्यात आली. शिखर समितीच्या मान्यतेनंतर त्यासंदर्भातील शासन निर्णय नियोजन विभागाकडून आज जारी करण्यात आला.

सातारा जिल्हा एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यानुसार श्रीक्षेत्र महाबळेश्र्वर, प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सह्याद्री व्याघ्र राखीव व वनक्षेत्रातील पर्यटन विकास व कोयना हेळवाक वन विभागांतर्गत कोयना नदी जलपर्यटन विकासाची कामे करण्यात येणार आहेत. मुनावळे येथे वॉटर स्पोर्टस् सुरू करण्यात येणार असून नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर वॉटर स्पोर्टस् असणारा हा पहिला प्रकल्प ठरणार असून त्यामुळे स्थानिकांना रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही त्यांच्या अध्यक्षतेखाली ८ फेब्रुवारी २०२४ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत, पर्यटन विकास आराखड्यामध्ये महाबळेश्र्वर, प्रतापगड, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प पर्यटन विकास आराखड्यानुसार कामे करताना मूळ वास्तू आणि परिसराच्या सुशोभीकरणाची कामे नैसर्गिक रंग वापरून, बांधकामाचे साहित्य देखील पर्यावरण पूरक वापरण्याचे निर्देश दिले होते.

प्रतापगड किल्ला जतन आणि संवर्धन याबाबी लक्षात घेऊन गडावर जाणारे व येण्याचे मार्ग, बुरुज व तटबंदी बांधकाम, किल्ल्यावर झालेल्या पडझडीच्या दुरुस्तीची कामे, पर्यटकांसाठी सोयीसुविधा यासर्व कामांचा पर्यटन विकास आराखड्यामध्ये समावेश करण्याची सूचना त्यांनी केली होती. किल्ल्याचे मूळ सौंदर्य कोणत्याही प्रकारे खराब दिसू नये याची खबरदारी घ्यावी. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात पर्यटन विकासाची कामे करताना या परिसरातील जैवविविधता राखली जावी. स्थानिक कृषी पर्यटनाला चालना मिळावी, स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा.

पर्यटन विकासाची कामे करतांना जिल्ह्यातील तसेच पश्र्चिम घाट क्षेत्रातील ऐतिहासिक वास्तूंची मूळ शैली जपण्याचे तसेच पुरातत्वीय जाण असलेल्या संस्थांकडून (भारतीय पुरातत्व विभाग तसेच राज्य पुरातत्वीय विभाग) सदर कामे करुन घेण्यात यावीत, आदी सूचनाही उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी त्यावेळी बैठकीत केल्या होत्या. त्यानुसार सुधारीत आराखडा तयार करण्यात आला होता, त्यानुसार आजचा शासननिर्णय जारी झाला आहे. वाईचे आमदार मकरंद पाटील, जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनीही जिल्हा पर्यटनविकासाचा आराखडा परिपूर्ण होण्यात आणि शासन निर्णय जारी होण्यात महत्वाची भूमिका बजावली.

# कारागृह हे सुधारगृह व्हावे - पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

चंद्रपूर, : कारागृहात राहणे, ही म्हटले तर शिक्षा आहे आणि एका दृष्टीने दीक्षाही आहे. वाल्याचा वाल्मिकी झाल्याची कथा सर्वांनी ऐकली आहे. आज तुम्ही सारे आंधारात आहात, कदाचित चांगल्या वर्तणुकीने उद्या प्रकाशात याल. बाहेर आल्यानंतर तुमच्या हातून उत्तम काम व्हावे, यासाठी हे केवळ कारागृह न राहता सुधारगृह व्हावे, अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

जिल्हा कारागृह येथे वरिष्ठ तुरुंगाधिकारी निवासस्थानाचे भूमिपूजन व महिला - पुरुष बंदीसाठी स्वतंत्र बॅरेक्सचे लोकार्पण करतांना ते बोलत होते. यावेळी कारागृहाचे अधिक्षक अनुपकुमार कुमरे, सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, अभियंता श्री. येरगुडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. मंगेश गुलवाडे, वरिष्ठ तुरुंगाधिकारी सतिश सोनवणे, नागेश कांबळे, तुरुंगअधिकारी महेश माळी, जनरल सुभेदार महेंद्र हिरोळे आदी उपस्थित होते.

येथील निवासस्थान व इतर सुविधांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून २ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, क्षमतेपेक्षा जास्त संख्या या कारागृहात आहे. चार वर्षांपूर्वी येथील व्यवस्थेची पाहणी केली असता विविध सोयीसुविधांसाठी १४ कोटी रुपये दिले. हा केवळ तुरुंग न राहता हे सुधार केंद्र व्हावे, यासाठी ३३ कोटींची मागणी करण्यात आली आहे. कारागृहाची क्षमता ४८६ असून सद्यस्थितीत



येथे ७२० कैदी आहेत. त्यामुळे क्षमतेमध्ये तसेच सोयीसुविधांमध्ये वाढ करण्याच्या सुचना प्रशसनाला दिल्या आहेत.

पुढे पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, येथे वाचनालय आणि खेळाचे प्रकार आहेत. कैद्यांना वाचण्यासाठी उत्तमातीत उत्तम पुस्तके आपण स्वत:च्या निधीमधून देण्यासाठी तयार आहोत. प्रत्येकाच्या मनात द्वंद सुरू असते. त्यामुळे चांगली आणि दर्जेदार पुस्तके वाचली तर मनातील द्वंद संपुष्टात येऊ शकते. या कारागृहात आयुष्याचे तत्व शिकण्याचे, उत्तम संस्काराचे शिक्षण मिळावे, अशी अपेक्षा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

यावेळी त्यांनी कारागृह परिसरात असलेल्या हजरत मखदुम शहाबुद्दीन शहा यांच्या दर्ग्याला भेट देऊन पाहणी केली. तसेच चादर चढवून प्रार्थना सुद्धा केली. सोबतच कारागृहाच्या नवीन बराकीचे आणि येथे कैद्यांसाठी नव्याने बांधलेल्या रुग्णालयाचे उद्घाटन पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी केले.

१४ कोटी रुपयांतून झालेल्या सुविधा

चंद्रपूर जिल्हा कारागृहात ५०० बंद्यांकरीता नवीन बॅरेक्सचे बांधकाम व अन्य अनुषंगिक कामांतर्गत पुरुष बंद्यांकरीता २ बॅरेक इमारतींचे बांधकाम, महिला बंद्यांकरीता बॅरेक इमारत, पुरुष विभक्त बंदी कक्ष, महिला विभक्त बंदी कक्ष, दवाखाना, तपासणी कक्ष, पुरुष कक्ष, महिला कक्ष, औषध भांडार आदी कामे करण्यात आली आहेत.

# नंदुरबार तालुक्यात ३ हजार ३३६ नागरिकांना देणार शबरी योजनेतून घरकुले - डॉ. विजयकुमार गावित

नंदुरबार, (जिमाका वृत्त) - नंदुरबार तालुक्यात ३ हजार



३३६ पात्र आदिवासी बांधवांना शबरी योजनेतून घरकुले देण्याचा मानस आहे. तसेच कामगार, मजूर बांधवांना आवश्यक असलेली गृहोपयोगी भांडी तसेच मोफत उज्वला गॅस कनेक्शनही दिले जाईल, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी केले आहे. नंदुरबार शहरातील छत्रपती शिवाजी नाट्य मंदिरात आयोजित शबरी घरकुल योजनेचे आदेश वाटप व कामगार कल्याण मंडळाच्या गृहोपयोगी वस्तुंच्या वितरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित, खासदार डॉ. हिना गावित, आमदार आमश्या पाडवी, जिल्हा परिषद सदस्या राजश्री गावित, अर्चना गावित नटावदच्या सरपंच जयश्री गावित नंदुरबार आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्पाधिकारी चंद्रकांत पवार यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री डॉ. गावित म्हणाले, या जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांचे आम्ही लोकसेवक आहोत. येथील नागरिकांचे गुजरात राज्यातील स्थलांतर रोखण्यासाठी, त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी ज्या काही उपाययोजना कराव्या लागतील त्या सर्व उपाययोजना केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून करण्यास कटीबद्ध आहे. जिल्ह्यातील पेयजल, सिंचनासाठी पाणी, दळणवळण, आरोग्य संस्थांचे निर्माण आणि विस्तारीकरण त्याच बरोबर शेतीपूरक उद्योगासाठी भरीव अशा निधी आणि उपक्रमांची तरतूद करण्यात आली आहे. जन्मापासून मनुष्याचे संपूर्ण जीवन समृद्ध करणाऱ्या योजना शासनाच्या आहेत. अलिकडे गेल्या १० वर्षात जीवनमान उंचावणाऱ्या योजना तळागाळातल्या माणसांसाठी केंद्र व राज्य शासनाने तयार केल्या आहेत. या सर्व योजना जिल्ह्यात पोहचवण्यासाठी वचनबद्ध असल्याचेही डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितले. जिल्ह्यातील नागरिकांनी जास्तीतजास्त योजनांचा लाभ घेवून आपले जीवनमान सुधारण्याचे आवाहन यावेळी जि.प.अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित यांनी केले.

## लभूत रसायनशास्त्राचे ज्ञान वृद्धिंगत करण्याची आवश्यकता - प्रा.आनंद पाठक

लातूर : जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती ही सर्वश्रेष्ठ असून प्रत्येक विद्यार्थ्यांनी ' मातृदेवो भव,पितृदेवो भव आणि आचार्य देवोभव ' या शिकवणीप्रमाणे जीवनात आचरण केले पाहिजे.आई-वडील गुरुजनांचा आदर करीत भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्याप्रमाणे विनम्रपणे वागलं पाहिजे.पीएच.डी.पदवी प्राप्त केली म्हणजे सर्व शिक्षण संपले असे नाही. कारण शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.म्हणूनच विद्यार्थ्यांनी मूलभूत **(पान ४ वर)....**

# अर्थसंकल्पातून वडार समाज उपेक्षितच.. दिलेल्या अश्र्वासनांची पूर्तता होणार का? वडार समाज संघाची मागणी

**लातूर / प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे २०२४-२५ चे अंतरिम अर्थसंकल्प वित्त मंत्री यांनी विधानसभेत दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी सादर केले. परत एकदा या अर्थसंकल्पातून वडार समाजाची निराशाच झाली आहे. वडार समाजाला दिलेल्या अश्र्वासनांचा सरकारला विसर पडला आहे, हेच यातून दिसून आले. या शिवाय नवीन असे काही नाही. हे बजेट शोषित, वंचित समाजाला वंचित ठेवणारे आहे. बजेटचे hight light पाहिले तर हे बजेट निराशाजनक असल्याचे लक्षात येईल. त्यात वडार समाज कुठेच नाही. असे सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ,महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी प्रसिद्धीपत्रक निवेदनाद्वारे केले आहे.**

वर्ष २०२३-२४ च्या बजेटमध्ये

१.वडार जमातीच्या उन्नतीसाठी वडार आर्थिक विकास महामंडाळाची घोषणा केली होती. उपलब्धी काय? २.याच्या आधी वडार जमातीच्या ११ मागण्यांच्या अधिसूचनांच्या घोषणेची पूर्तता झाली का? ३. वडार जमातीच्या आर्थिक उन्नतीसाठी ५० कोटींची घोषणा केली होती. यावर काय झाले आणि किती निधी खर्च झाला? ४.उद्योग-व्यवसाय करण्यासाठी कर्जाची उपलब्धी निधी बाबत घोषणा केली होती, याचे पुढे काय झाले?

जवळपास अनेक प्रकारच्या महत्वाच्या घोषणा मागील वर्षीच्या आणि महामेळाव्यातील घोषणा आदी बजेट मध्ये पूर्ण होईल असे वाटले होते. सरकारने दिलेल्या अश्र्वासनांची या ठिकाणी त्या प्रत्येक घोषणे बाबत केलेल्या कामाची माहिती सरकारने देणे क्रमप्राप्त आहे. नाहीतर घोषणा हवेतच राहतील, मिळणार काही नाही. ज्याअर्थी घोषणा केल्यात तेव्हा काही तर नक्कीच झाले असणार, पण पुढे त्याचे काय झाले? याचे कोणालाच काही सोयरसूतक नसल्याचे परत एकदा दिसून आले.



वर्ष २०२३-२४ चे विकास खर्चाचे बजेट - प्लॅन बजेट १,७०,००० कोटीचे होते. यापैकी खर्च किती? या बजेटमध्ये वडार जमातीच्या आर्थिक विकासासाठी ५० कोटी आणि महामेळाव्यामध्ये (२०१८) ५० कोटींची घोषणा केली होती. यापैकी किती खर्च ,कोणत्या योजनांवर व लाभ किती लोकांना मिळाला हे सरकारने सांगावे. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये पहिल्यांदा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून केवळ ५ कोटींची घोषणा करून केवळ बोळवण करण्याचे काम सरकार करू पाहते आहे का? हाही या ठिकाणी प्रश्र्नचिन्ह आहे. कारण आचारसंहिता आठ ते दहा दिवसात लागण्याची शक्यता आहे. त्यापार्श्र्वभूमीवर दिलेल्या ५ कोटीचे गणित कसे लागणार? हा ही याठिकाणी विचार करावा लागणार. हे ५ कोटी मिळणार? का परत एकदा वेळ मारून नेण्याचा हेतू आहे. हा ही आता चिंतनशील प्रश्र्न बनला आहे.

वर्ष २०२४-२५ मध्ये वडार जमातीसाठी अर्थसंकल्पामध्ये आवश्यक निधी तरतूद १५० कोटी पाहिजे, दिले ५ कोटी,नाकारले १४५ कोटी. यातून सरकार वडार जमातीबाबत सकारात्मक आहे का? हाच प्रश्र्न निर्माण होतो. बजेट मुळातच लोक कल्याणाचे, विकासाचे असते. त्यातही मूलभूत सुविधा, मूलभूत गरजा भागविणे, उपजीविका, रोजगार, शिक्षण, आरोग्य, कामगार कार्यालयाचा वाटा किती?, घरकुल मंजूर होतात किती? यावर भर देणे आवश्यक असते. संविधानाच्या अनुच्छेद २१ व ४६ चे उद्देश पूर्तीसाठी बजेटची रचना पाहिजे. समाजातील शोषित वंचित, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक दुर्बल घटक, युवा, महिला, शेतमजूर , शेतकरी, हा वर्ग नजरेसमोर ठेवून बजेट तयार व्हायला पाहिजे. मात्र, नेहमीच्या काही पॉप्युलर घोषणा वगळता, बजेटची तरतूद मोठ्याप्रमाणात ळपषीर्रीीर्ळीीश वर खर्च होताना दिसते. मागील बजेटचे हळसहश्रळसहीं मध्ये उल्लेख आहे. वर्ष २०२२-२३ च्या बजेटचे घोषवाक्य होते पंचसूत्री आणि २०२३-२५ चे होते पंचामृत. वर्ष २०२४-२५ च्या बजेट मध्ये युवा, महिला, गरीब, शेतकरी, कामगार,घरकूल या शब्दांचा वापर करण्यात आला. मात्र यांच्यासाठी विशेष योजना भरीव तरतुदीसह घोषित झाल्या नाहीत. ओबीसी व अल्पसंख्याकांसाठी ५१८० कोटींची तरतूद आहे.

अतिअल्प तरतूद केली आहे. यावर बोलण्याची गरज आहे. ओबीसी, भटके- विमुक्त यांच्यासाठी बजेट वाटपाचे धोरण निश्र्चित करण्याची गरज आहे. तसेच वडार जमातीच्या बजेटचा कायदा झाला पाहिजे. यावर वडार जमातीच्या वतीने वारंवार सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न झाला मात्र, वडार समाजहिताच्या योजनेकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. वडार जमातीला दिलेल्या अश्र्वासनांचं काय झाले? का केवळ निवडणुकीच्या तोंडावर मतांचे गणित जुळवण्यासाठी हे सारे काही होतेय काय? असे सामाजिक कार्यकर्ते भटक्या- विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ,महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

# लातूर शहराच्या विकासकामात खोडा घालण्याचा काँग्रेसचा प्रयत्न -भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे

लातूर/प्रतिनिधी: लातूर शहरात विकास कामे होऊ नयेत.शहर मूलभूत सोयी- सुविधा आणि गरजांपासून वंचित रहावे,हेच काँग्रेसचे धोरण असून यामुळे विविध विकासकामांसाठी राबविण्यात येणारी निविदा प्रक्रिया बंद पाडण्याचे पाप काँग्रेसच्या विशिष्ट नेत्यांनी केले असल्याचे मत भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी व्यक्त केले. भाजपच्या लोकप्रतिनिधींनी शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी केंद्र व राज्य शासनाकडून उपलब्ध करून दिला आहे.या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली जाणार आहेत.त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली जात आहे. परंतु शहरातील नागरिक विकास कामांपासून वंचित रहावेत,त्यांना मूलभूत तसेच अद्ययावत सोयी- सुविधा उपलब्ध होऊ नयेत,हेच काँग्रेस पक्षाचे धोरण आहे.त्यामुळे काँग्रेस पक्षाच्या कांही ठराविक नेत्यांनी प्रशासनावर दबाव आणून निविदा प्रक्रिया बंद पाडण्याचे पाप केले आहे, असे मतही देविदास काळे यांनी व्यक्त केले.

लातूर शहराला विकासापासून दूर ठेवायचे,केवळ खोटी आश्र्वासने देऊन त्या जोरावर निवडणुका जिंकायच्या,हेच काँग्रेसने आजवर केले आहे.विकास कामे करतानाही मर्जीतील गुत्तेदारांना निविदा देऊन गुत्तेदार जगवण्याचे काम त्या पक्षाकडून केले गेले.

याउलट भारतीय जनता पक्षाने नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी मंजूर करून दिला आहे.या कामातून शहरात विकास कामे होतील.ही कामे झाल्यानंतर नागरिक भाजपाकडे आकर्षित होतील.यामुळे भाजपाचा आगामी निवडणुकातील विजय निश्र्चित होईल तर काँग्रेस पक्षाचा जनाधार संपुष्टात येईल,अशी भीती काँग्रेसच्या नेत्यांना वाटत आहे.यामुळेच काँग्रेसच्या ठराविक नेत्यांनी मंगळवारी (दि.५ )मनपा कार्यालयात राबविली जात असलेली निविदा प्रक्रिया बंद पाडली.यातून शहरात होणारी विकास कामे अडविण्याचे पाप काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी केले आहे.ही बाब शहरातील सुजाण नागरिकांच्या लक्षात आलेली असून जनता योग्य वेळी त्याचे उत्तर देईल,असेही देविदास काळे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## खा. चिखलीकर यांच्या निधीतून भोकर मध्ये आज तीन कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन

भोकर – खा. प्रतापराव पाटील



**चिखलीकर यांच्या विकास निधीतून भोकर शहरातील तीन कोटी दहा लक्ष रुपयांच्या विविध कामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण आज दिनांक ६ मार्च रोजी दुपारी दोन वाजता करण्यात येणार आहे . यावेळी खा. अशोक चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.**

खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या माध्यमातून नांदेड लोकसभा मतदारसंघात विविध विकास कामांचा सपाटा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. खा. चिखलीकर यांच्या विकास निधीतून अनेक महत्त्वपूर्ण कामानाही मंजुरी मिळाली आहे . भोकर शहरातील तब्बल तीन कोटी दहा लक्ष रुपये कामांच्या भूमिपूजनाचा सोहळा आज पार पडणार असून या विकास कामात न.पा.हददीतील गांधी चौक, लक्ष्मी मंदिर पुढील रोड ते नरसिंगराव देशमुख यांच्या घरापर्यंत सी.सी.रस्ता करणे. तेली गल्ली मारोती मंदीर पासून ते कृषी कार्यालयाच्या ऑफिस पर्यंत सी.सी.रस्ता करणे. श्री नारायण पाटील गोंड यांच्या घरापासुन ते नरसिंहराव देशमुख यांच्या घरा पर्यंत सी.सी.रस्ता करणे. न.पा.हद्दीतील वार्ड क्र.७ कोळी गल्ली येथील श्री भुजंगराव शेटे गुरुजी यांचे घर ते लक्ष्मी मंदीरा पर्यंत सी.सी.रस्ता करणे. न.पा.हद्दीतील वार्ड क्र.११ नंदीग्राम बसस्टॅन्ड रोड बालाजी गंगासागरे यांच्या घरा पासून ते शफी इनामदार यांच्या घरा पर्यंत सी.सी. रस्ता करणे. बटाळा रोड ते सीड फॉर्म रस्ता डांबरी करन करणे. न.पा.हद्दीतील प्रभाग क्र.३ आसावा जिनिग पसतापुरे यांच्या घरा पासून ते रायपत्रेवार यांच्या घरा पर्यंत सी.सी.रस्ता करणे. न.पा. हद्दीतील प्रभाग क्र.४ जि.प.शाळेच्या पाठीमागे सी.सी.रस्ता व नाली बांधकाम करणे. न.पा.हद्दीतील वार्ड क्र.८ श्री संतोष देशमुख यांचे घर ते ऊर्दु शाळे पर्यंत सी.सी.रस्ता करणे. न.पा.हद्दीतील वार्ड क्र.१५ येथील स्मशानभुमी सेड व लोखंडी जाळया बसविणे. न.पा.हद्दीतील वार्ड क्र.०१ येथील आदित्य सोसायटी मधील पालेपवाड यांचे घरा पासून ते डॉ. व्यंकट माने यांच्या घरा पर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे. न.पा. हद्दीतील वार्ड क्र.०१ येथील विजया घिसेवाड यांचे घरा पासून ते मारोती श्रीरामवार यांच्या घरा पर्यंत सी.सी. रस्ता व नाली बांधकाम करणे. न.पा. हद्दीतील श्री सेवालाल गड देवस्थान येथे सभागृहाचे बांधकाम करणे. न.पा. हद्दीतील वार्ड क्र.०१ येथील बायपास रोड ते केंद्रीय आश्रम शाळे पर्यंत सी.सी. रस्ता करणे. न.पा.हद्दीतील वार्ड क्र.०१ येथील वाघमारे यांचे घर ते महिंद्र कदम यांच्या घरा पर्यंत सी.सी.रस्ता करणे.

आधी कामांचा समावेश असून भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळ्यासाठी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह खा. अशोक चव्हाण , खा. डॉ. अजित गोपछडे, माजी मंत्री डॉ.माधवराव किन्हाळकर , आ. राम पाटील रातोळीकर, आ. तुषार राठोड , आ. भीमराव केराम , आ. राजेश पवार, माजी आमदार अमरनाथ राजुरकर, माजी आ. सुभाष साबणे, देविदास राठोड , नांदेड भाजपा लोकसभा अध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजगावकर , जिल्हा अध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे , महानगर अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते , माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले, भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ प्रणिताताई देवरे – चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर आणि नांदेड उत्तरचे भाजपा जिल्हा अध्यक्ष एडवोकेट किशोर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून या भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळ्यास नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन भोकर तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

### लभूत रसायनशास्त्राचे

**(पान ३ वरुन)** रसायनशास्त्राचे अद्ययावत ज्ञान जास्तीत–जास्त वृद्धिंगत करण्याची आवश्यकता आहे,असे प्रतिपादन हैदराबाद विद्यापीठातील स्कूल ऑफ फिजिक्सचे माजी प्रा.आनंद पाठक यांनी केले. येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेस,बेंगळुरू,आयएनएसए, नवी दिल्ली आणि एनएएसआय, प्रयागराज यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०५ व ०६ मार्च २०२४ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या विज्ञान अकादमीच्या ' मूलभूत रसायनशास्त्र ' या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

# युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोदी सरकार पुन्हा सत्तेत येणे आवश्यक

**मुंबई : मोदी सरकारच्या कार्यकाळात युवा पिढीच्या कर्तृत्वाला अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. गेल्या दहा वर्षांत देशाच्या झालेल्या प्रगतीत युवा पिढीचाही मोठा वाटा आहे. त्यामुळे नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी युवकांनी सर्व पातळ्यांवर प्रयत्न करावे, असे आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी जळगांव येथे केले.**



भारतीय जनता पार्टी तर्फे आयोजित युवक मेळाव्यात श्री.शाह बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, राज्याचे ग्राम विकास मंत्री गिरीश महाजन, आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, खा.उन्मेष पाटील, खा.रक्षा खडसे, खा. डॉ.हीना गावित, खा. डॉ. सुभाष भामरे, भाजपा प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, भाजपा जिल्हाध्यक्ष उज्ज्वला बेंडाळे, अमोल जावळे, ज्ञानेश्र्वर जळकेकर महाराज आदी यावेळी उपस्थित होते. या मेळाव्याला युवक युवतींची प्रचंड संख्येने उपस्थिती होती.

श्री. शाह म्हणाले की, मोदी सरकारने विकसित भारत घडविण्यासाठी युवक, महिला, शेतकरी, गोरगरीब वंचित अशा सर्व वर्गांसाठी अनेक धोरणे आखली. युवा पिढीला उद्योग –व्यवसायात आपले कर्तृत्व सिद्ध करता यावे यासाठी मोदी सरकारने संधी उपलब्ध करून दिल्या. स्टार्ट अप च्या माध्यमातून अनेक युवा उद्योजक तयार झाले. युवा पिढीने देशाच्या विकासात मोठा हातभार लावला आहे.

या वेळची निवडणूक देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. भारताला विश्र्वगुरु बनविण्याची क्षमता असलेले मोदी सरकार पुन्हा सत्तेवर येणे युवा पिढीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. देशाला तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवणे, २०३६ मध्ये भारतात ऑलिम्पिक स्पर्धा भरविणे आणि २०४० मध्ये चंद्रावर अंतराळवीर पाठवणे अशी दृष्टी ठेवून मोदी सरकार काम करत आहे, असेही श्री. शाह यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी विरोधकांच्या घमंडिया आघाडीवर आणि राज्यातील महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. घमंडिया आघाडीतील पक्षांना आपल्या कुटुंबाचीच काळजी आहे, त्यांना जनतेची काळजी नाही. मोदी सरकार देशवासियांची काळजी घेण्यास कटीबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले.

# लातूरच्या पथदर्शी कामाचा इतर जिल्हयांनी आदर्श घ्यावा – विभागीय आयुक्त श्री. मधुकर राजे अर्दड

छत्रपती संभाजीनगर, (विमाका):– लातूर जिल्हयाने टीमवर्कच्या माध्यमातून विविध क्षेत्रात चांगले काम केले आहे. मराठवाडयातील इतर जिल्हयांनीही लातूरच्या पथदर्शी कामाचा आदर्श घ्यावा, लातूरप्रमाणेच आपल्या जिल्हयातही पथदर्शी काम उभे करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त श्री. मधुकर राजे अर्दड यांनी केले.




विभागीय आयुक्त कार्यालयात ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने २०२०–२१ व २०२२–२३ या वर्षातील विभागस्तरीय पुरस्काराचे वितरण विभागीय आयुक्त श्री. अर्दड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनमोल सागर, उपायुक्त सुरेश बेदमुथा, डॉ. सीमा जगताप आदी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त श्री. अर्दड म्हणाले, लातूर जिल्हा शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत नेहमीच अग्रेसर राहीला आहे. गुड गर्व्हर्नसमध्येही जिल्ह्याने पथदर्शी काम केले आहे. लातूरचा एक पॅटर्न आहे. शिक्षण क्षेत्रासोबतच लातूर जिल्हयाने टीमवर्कच्या माध्यमातून विविध क्षेत्रात चांगले काम केले आहे. मराठवाडयातील इतर जिल्हयांनीही लातूरच्या पथदर्शी कामाचा आदर्श घेत आपल्या जिल्हयातही पथदर्शी काम उभे करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पंचायतराज व्यवस्थेत पुरस्कार प्राप्त स्थानिक स्वराज्य संस्थांचा गौरव करून श्री. अर्दड म्हणाले, मराठवाडयात पंचायतराज व्यवस्थेत चांगल्या पध्दतीने काम सुरू आहे. पर्यावरण क्षेत्रात कामाची गरज असून यासाठी सर्वांचा सहभाग महत्वाातचा आहे. पर्यावरणाचा समतोल जपला गेला पाहीजे. गावशिवारात हिरवाई जपण्यासोबतच पर्यावरणाच्या संवर्धनासाठी प्रत्येक घटकाने पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

२०२०–२१ विभागीय स्तर प्रथम क्रमांक पंचायत समिती लातूर रू. ११ लक्ष, द्वितीय क्रमांक पंचायत समिती नांदेड रू. ८ लक्ष, तृतीय क्रमांक पंचायत समिती शिरूर अनंतपाळ, जि. लातूर रू.६ लक्ष. धनादेश आणि स्मृतीचिन्ह यांचे विभागीय आयुक्त श्री. अर्दड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

सन २०२२–२३ जिल्हा परिषद लातूर यांना राज्यस्तरीय तृतीय क्रमांक रू.१७ लक्ष, पंचायत समिती लातूर यांना राज्यस्तर प्रथम क्रमांक रू.२० लक्ष, पंचायत समिती लातूर यांना विभागस्तर प्रथम क्रमांक रू.११ लक्ष, पंचायत समिती जळकोट, जि.लातूर यांना विभागस्तर द्वितीय क्रमांक रू.८ लक्ष, पंचायत समिती, अर्धापूर जि.नांदेड यांना विभागस्तर तृतीय क्रमांक रू.६ लक्ष असे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त सुरेश बेदमुथा यांनी केले. डॉ. सीमा जगताप यांनी आभार मानले. विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# लातूर जिल्ह्यात राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ९८४ दावे निकाली !

लातूर, (जिमाका): राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या आदेशानुसार लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने लातूर जिल्हा सत्र न्यायालय येथे राष्ट्रीय लोक अदालतीचे ३ मार्च, २०२४ रोजी आयोजन करण्यात आले होते. जिल्हा विधी प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश न्या. व्ही. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ९८४ दावे निकाली काढण्यात आले.

मोटार अपघात, नुकसान भरपाई प्रकरणे, कौटुंबिक न्यायालय व ग्राहक मंच प्रकरणे, भू–संपादन, १३८ एन.आय. क्ट, कौटुंबिक हिंसाचार प्रकरणे, लवाद, हिंदू विवाह कायद्यातंर्गत प्रकरणे व कोर्टात प्रलंबित असलेली तडजोड पात्र दिवाणी व फौजदारी प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्यात आलेली होती. तसेच वादपूर्व प्रकरणामध्ये सर्व बँकाचे वसुली दावे, वित्त संस्था तसेच भ्रमणध्वनी कंपनी भारत संचार निगम लिमिटेड यांची रक्कम वसुलीबाबतची प्रकरणे ठेवण्यात आलेली होती.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये विमा कंपन्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. आयसीआयसीआय लोंबार्ड इन्शोरन्स कंपनीकडील एका ४५ लाख रुपयामध्ये तडजोड करण्यात आली. या प्रकरणात अर्जदाराचे वकील अॅड ए. एस. बावणे आणि अॅड जी. के. सुरवसे व प्रतिवादीचे वकील अॅड एस.जी. डोईजोडे यांनी काम पाहिले. या पॅनलवर पॅनल लातूर प्रमुख जिल्हा न्यायाधीश–३ पंच म्हणून अॅड. एस. डी. लखादिवे यांनी काम पाहिले. तसेच इतर इन्शोरन्स कंपन्यांचे वकील यांनी राष्ट्रीय लोकअदालतीला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. तसेच २०२३ मध्ये कौटुंबिक न्यायालयात दाखल झालेला दावा तडजोडीअंती निकाली काढण्यात आला. या प्रकरणात अॅड बी. पी. शिवलकर यांनी काम पाहिले . या पॅनलवर पॅनल प्रमुख म्हणून जिल्हा न्यायाधीश –२ एस. टी त्रिपाठी आणि पॅनल पंच अॅड कल्पना एम. भुरे यांनी काम पाहिले.

तसेच या लोक अदालतीमध्ये पॅनलवर अॅड कल्पना एम. भुरे, अॅड एस. डी. लखादिवे, अॅड. संध्या बी. जोशी, अॅडअझरुद्दीन मनियार, अॅड शिवकुमार जी. क्षिरसागर, अॅड सुनैना (ठाकूर) बायस,अॅड राधा जी. वाघमारे, अॅड. एस. व्ही. सलगरे यांनी पॅनल पंच म्हणून काम पाहिले. तसेच लोकअदालत यशस्वी करण्यासाठी पक्षकार, विधीज्ञ व संबंधित अधिकाऱ्यांनी सहकार्य केले. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश न्या. व्ही.व्ही. पाटील, सर्व न्यायीक अधिकारी, जिल्हा विधी प्राधिकरणच्या सचिव एस. डी. अवसेकर, बार कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा सदस्यअॅड. अण्णाराव जी. पाटील, जिल्हा वकिल मंडळाचे अध्यक्ष ड. महेश बामनकर, उपाध्यक्ष गजानन यु. चाकुरकर, सचिव अॅड प्रदिपसिंह टी. गंगणे, महिला सचिव हर्षला जी. जीशी व इतर पदाधिकारी तसेच जिल्हा सरकारी वकील मंडळ लातूर व न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### कायमस्वरूपी उपविभागीय अधिकाऱ्याची नियुक्ती करून जात प्रमाणपत्रे त्वरित वाटप कराः भाई ड.नारायण गोले पाटील

माजलगाव (प्रतिनिधी)उपविभागीय अधिकारी कार्यालयात माजलगाव,धारूर,वडवणी तालुक्यातील मराठा समाजासह सर्वच जातीतील विद्यार्थी व नागरिक यांचे जात प्रमाणपत्र माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयाला कायमस्वरूपी अधिकारी नसल्यामुळे गेल्या दोन ते अडीच महिन्यापासून प्रलंबित असून अनेक विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रा शिवाय स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्यास अनंत अडचणी निर्माण होत असल्याने,तसेच जात प्रमाणपत्रा अभावी स्पर्धा परीक्षा व इतर नोकरीतील निवड न होण्याची भीती वाटत असल्याने विद्यार्थ्या सह नागरिक उपविभागीय अधिकारी कार्यालयाला खेटे मारत असून उपविभागीय अधिकारी कार्यालयाचा पदभार असलेल्या तहसीलदार यांना कामाचा व्याप जास्तीचा झाल्याने ७हजारो विद्यार्थी व नागरिक जात प्रमाणपत्रापासून वंचित असल्यामुळे शासनाने उपविभागीय अधिकारी कार्यालयाला कायमस्वरूपी अधिकारी नेमून हजारो जात प्रमाणपत्र धारकांना तात्काळ जात प्रमाणपत्रे अदा करावीत अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड.नारायण गोले पाटील यांच्यासह श्रीराम शेवाळे,सतीशराव रिंगणे,मुंजा पांचाळ,राहुल सोळंके,साळुजी हांडे, विष्णू शेळके,अशोक कुलकर्णी,सतीश शेजुळ, आनंत चव्हाण,गणेश चव्हाण,कडाजी नावडकर, सुशील हांडे,चांगदेव शेजुळ आदींनी दिला आहे.

# शासनाच्या विविध योजनांचा लाभ देवून भटक्या विमुक्तांना विकासाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न – जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे

**लातूर, (जिमाका): शासनाच्या निर्देशानुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती, आदिवासी जमातीमधील वंचित घटकांना शासकीय योजनांचा लाभ देवून त्यांना विकासाच्या प्रवाहात आणले जाणार आहे. यासाठी राज्य लातूर जिल्ह्यात अशा घटकांना विविध शासकीय योजना, प्रमाणपत्रे वितरीत करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी सांगितले. मुरुड येथे विमुक्त जाती व भटक्या जमाती, आदिवासी जमातीमधील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी महाराजस्व अभियान अंतर्गत आयोजित शिबिरात त्या बोलत होत्या.**

सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, मुरुडच्या सरपंच अमृता नाळे, उपसरपंच हनमंत नागटिळक, नायब तहसीलदार गणेश सरोदे, भटके विमुक्त विकास परिषदेचे नरसिंह झरे यावेळी उपस्थित होते. यावेळी वडार, पारधी, मांग गारुडी, डवरी गोसावी, बंडी धनगर, कैकाडी, वासुदेव, मसण जोगी, वैदू समाज समाजातील सुमारे ३०० कुटुंबे यावेळी उपस्थित होती. सर्व समाज घटकांना यावेळी व्यासपीठावर प्रतिनिधित्व देण्यात आले होते.

अनेकदा आवश्यक कागदपत्रे नसल्याने विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळत नाही. त्यामुळे अशा नागरिकांना प्रथम आधारकार्ड, रेशनकार्ड, राष्ट्रीयत्व दाखला, उत्पन्नाचा दाखला यासारखे प्रमाणपत्र उपलब्ध करून देवून त्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत आहे. सतत भटकंती आणि संघर्षमय जीवन जगणाऱ्या या घटकाला त्यांच्या पालापर्यंत, घरापर्यंत पोहचून योजनांची माहिती देवून त्यासाठी त्यांचे अर्ज भरून घेतले जात आहेत.



या योजनांच्या माध्यमातून विमुक्त जाती व भटक्या जमाती, तसेच आदिवासी जमातीमधील घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे म्हणाल्या.

भटक्या, विमुक्तांना शासनाच्या योजनांचा लाभ देवून त्यांच्या विकासासाठी राज्य शासन आणि प्रशासन करीत असलेल्या प्रयत्नाचे भटके विमुक्त विकास परिषदेचे नरसिंह झरे यांनी कौतुक केले. तसेच आतापर्यंत शासकीय योजनांच्या लाभापासून दूर असलेल्या भटक्या, विमुक्त घटकांना योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यासह राज्यभर शिबिरे होत असल्याचे त्यांनी सांगितले.

विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील नागरिकांना महसूल विभागामार्फत शासकीय प्रमाणपत्रे, विविध दाखले आणि शासनाच्या योजनाचा लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी या घटकातील कुटुंबांचा सर्वे करण्यात आला असून प्रत्येकाला योजनांचा लाभ देण्यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी सांगितले.

घरकुल योजना, आधार नोंदणी, मतदार नोंदणी, संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ निराधार योजनेचे अर्ज यावेळी भरून घेण्यात आले. तसेच उत्पन्न दाखले, रेशनकार्ड, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, अंत्योदय योजनेतून साडी, विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

तसेच यावेळी आयोजित आरोग्य शिबिरात उपस्थित नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधीचे वाटप करण्यात आले.

प्रास्ताविक उपसरपंच हनमंत नागटिळक यांनी केले. बहुरूपी कला सादर करणारे मोहन सगर, सुनील साळुंखे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894